| MHKO160003552025 | **<u>किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १८/२०२५ मधील नि.क्र.१ वरील आदेश</u>** |
|---|---|

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज, सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ९ नियम ९ अन्वये रे.क.क्र.२८/२०१४ पुन्हा फैलावर घेणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांनी वि.प. यांचेविरूध्द रे.क.क्र.२८/२०१४ हा दावा कायम मनाईकरीता दाखल केला होता. सदरचा दावा दि.१७/०३/२०२५ रोजी वादीनी कोणताही पुरावा न दिलेने काढून टाकण्यात आला आहे. अर्जदार यांनी पुढे कथन केले की त्यांना दि.१७/०३/२०२५ व दि.१९/०९/२०२४ रोजीचे आदेशाची कल्पना नव्हती, तसेच अर्जदारांनी जाणीवपूर्वक पुराव्याची हेळसांड केलेली नाही, अर्ज मंजूर केल्यास वि.प. यांचे कोणतेही नुकसान होणार नाही, तसेच सदरचा दावा रिस्टोअर केल्यास त्याच दिवशी अर्जदार शपथपत्र घालण्यास तयार आहेत. शेवटी त्यंनी सदरचा अर्ज मंजूर करून रे.क.क्र.२८/२०१४ मधील दि.१७/०३/२०२५ रोजीचा मूळ दावा काढून टाकणेचा आदेश रद्द करून दावा पुन्हा फैलावर घेणेबाबत आदेश होणेची विनंती केली.

३. वि.प. क्र. १ ते ५ यांना समन्सची बजावणी होऊनदेखिल ते सदरकामी हजर न झालेने त्यांचेविरूध्द एकतर्फा आदेश पारीत करणेत आले आहेत. तसेच वि.प.क्र ६ मयत झालेने त्यांचे नाव कमी करणेबाबत अर्जदार यांनी नि.६ वर पुरशिस दाखल केली आहे.

४. मी अर्जदार यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला आहे. अर्जदार यांचे वादकथन आणि अभिलेखावरील पुरावा वाचला आहे. अर्जदार यांनी सदर अर्जाचे कामी नि.क्र.३ सोबत रे.क.क्र.२८/२०१४ मधील नि.१ वरील आदेशाची स.शि.ची नक्कल सादर केली आहे. अर्जदार यांनी नि.०८ वर त्यांचे प्रतिज्ञापत्र सादर करून त्यांनी त्यामध्ये मूळ अर्जाप्रमाणे कथन केले आहे. अर्जदार यांनी सदर अर्जाद्वारे रे.क.क्र.२८/२०१४ मधील दि.१७/०३/२०२५ रोजीचा मूळ दावा काढून टाकणेचा आदेश रद्द करून दावा पुन्हा फैलावर घेण्याची विनंती केली आहे. अर्जदार यांनी कथन केले की त्यांना रे.क.क्र.२८/२०१४ मधील दि.१७/०३/२०२५ व दि.१९/०९/२०२४ रोजीचे आदेशांची कल्पना नव्हती व त्यांनी पुरावा देण्याची हेळसांड केलेली नाही. तथापि अर्जदार यांना रे.क.क्र.२८/२०१४ मधील सदर आदेशांची कल्पना नव्हती यावरूनच त्यांना सदर दावा चालविण्यामध्ये कसूर केल्याचे स्पष्ट होते. वि.प. क्र. १ ते ५ यांना समन्सची बजावणी होऊनदेखिल ते सदरकामी हजर न झालेने त्यांचेविरूध्द एकतर्फा आदेश पारीत करणेत आले आहेत. तसेच वि.प.क्र ६ मयत झालेने त्यांचे नाव कमी करणेबाबत अर्जदार यांनी नि.६ वर पुरशिस दाखल केली आहे. तथापि अर्जदार व वि.प. यांचेतील मूळ वादाचे निराकरण करणेसाठी रे.क.क्र.२८/२०१४ हा गुणदोषावर निकाली होणे गरजेचे आहे. सबब, सदरचा दावा पुन्हा त्याच टप्प्यावर फैलावर घेणे गरजेचे दिसत आहे. त्याचवेळी

अर्जदार यांनी त्यांचे कथनांचे पृष्ट्यर्थ सादर केलेली कारणें ही विश्वासार्ह वाटत नाहीत. त्याचबरोबर झालेला विलंब विचारात घेता सदरचा अर्ज योग्य त्या दंड रकमेवर मंजूर करणे न्यायोचित होईल. तसेच सदरचा अर्ज मंजूर केलेने वि.प. यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. एकूणच, रे.क.क्र.२८/२०१४ हा अर्ज काढून टाकणेचे दि.१७/०३/२०२५ रोजीचे आदेश रद्द करून अर्ज पुन्हा फैलावर घेणेबाबत आदेश तो योग्य त्या दंड रकमेवर मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, वर नमूद चर्चेस अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्जदार यांनी तालुका विधी सेवा समिती, शाहुवाडी यांचेकडे दंड रक्कम रू.५,०००/- (अक्षरी रक्कम रू. पाच हजार ) आदेश तारखेपासून तीस दिवसांचे आत भरावी या अटीवर सदरचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. रे.क.क्र.२८/२०१४ हा दावा दि.१७/०३/२०२५ रोजी ज्या टप्प्यावर काढून टाकण्यात आला त्याच टप्प्यावर पुन्हा फैलावर घेण्यात येत आहे.

३. दंडाची रक्कम भरल्यानंतर प्रस्तुत अर्जातील पूर्ण संचिका रे.क.क्र.२८/२०१४ सोबत ठेवण्यात यावी.

४. सदरचा अर्ज याद्वारे निकाली करणेत येतो.

Digitally signed by Pankaj Bhimrao Pawar
Date: 2026.07.23 17:41:15 +0530

**दिनांक - २३/०७/२०२६** **( पी. बी. पवार )**
**दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**मलकापूर-शाहुवाडी, जि. कोल्हापुर**